गुरु विश्वंभर कृपा बहु उद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ, लाकड जवळगा द्वारा संचलित ....

# शिवनेरी महाविद्यालय, शिरूर अनंतपाळ, जि . लातूर

राष्ट्रीय सेवा योजना विभाग

## (National Service scheme )

विशेष शिबीर कार्यक्रम सन २०२२ - २३

मौजे तळेगाव ( दे ) ता . शिरूर अनंतपाळ, जि . लातूर

---

राष्ट्रीय सेवा योजनेचे घोषवाक्य माझ्यासाठी नसून तुमच्यासाठी (Not Me But You ) हे सार्थक करण्याचा प्रमाणिक प्रयत्न आमच्या शिवनेरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून केला आहे . या प्रयत्नांना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वंयसेवकाचा उत्स्फूर्त व प्रचंड प्रतिसाद लाभला आहे .याचा प्रत्यय वेळोवेळी नियमित व विशेष शिबिर कार्यक्रमाच्या माध्यमातून दिसून आला .

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने शैक्षणिक वर्षे २० २२- २३ चे १७ वे विशेष शिबिर घेण्यात आले . हे सात दिवसीय शिबिर "युवकांचा ध्यास : ग्राम - शहर विकास " हे ब्रिद वाक्य घेऊन आजादी का अमृत महोत्सव या वर्षानिमित्त मौजे तळेगाव (दे ) तालुका शिरूर अनंतपाळ जिल्हा लातूर येथे दिनांक १४ / 0२ / २०२३ ते २० / ०२ / २०२३या कालावधीत घेण्यात आले . या शिबिरात सहभागी झालेल्या राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवकांनी सामाजीक बांधिलकीच्या भावनेतून श्रमदान केले . तसेच सामाजीक जनजागृती अभियानात सहभागी नोंदवून राष्ट्रीय सेवा योजनेचे ध्येय व उद्दिष्ट पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे .

शिबिराच्या सात दिवसाच्या कालावधीत शिबिरामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी ग्राम स्वच्छतेवर भर देऊन व पर्यावरण संतुलन ठेवण्या साठी लावलेल्या झाडांना आळे, पाणी आदि गोष्टीसाठी श्रमदान केले . राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वंयसेवकांनी ग्रामस्थांना स्वच्छतेचे महत्व कृतीतून दाखवत सर्व सार्वजनिक परिसर खराटा हातात घेऊन झाडून स्वच्छ केले

SHIVNERI COLLEGE SHIRUR ANANTPAL

realme Shot on realme

. लावलेल्या झाडाना आळे केले व पाणी घातले . तसेच तुंबलेल्या गटारी रस्त्यावर साचलेले पाणी काढून दिले . रस्त्यावर पडलेला घनकचरा प्लास्टिक जमा करून त्याला योग्य पद्धतीने नष्ट करण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबरच ज्यामुळे रोगराई व डासांचे प्रमाण वाढत होते ,या स्वच्छतेमुळे ते कमी होण्यास मदत झाली .गावात ग्रामस्थांना शौचालयाचे महत्त्व पटवून देऊन त्यांना शौचालय उभारण्यास प्रवृत करून त्या शौचालयाचा वापर करण्यासाठी सामाजीक प्रबोधन व गिता च्या माध्यमातून वापरास प्रवृत केले . त्याबरोबरच राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या स्वयंसेवक यांनी गावातून ' बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी रॅलीच्या माध्यमातून जनजागृती केली .

महाविद्यालयाच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र साकोळचे वैद्यकीय अधिकारी डॉ . संदीप मंत्रे , डॉ विपुलता कांबळे व त्यांच्या सोबतच्या कर्मचारी त्या बरोबरच ग्रामीण रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ . सावन कडवकर यांच्या मार्गदर्शनाखाली, डॉ . बाबासाहेब त्रिभूवन, डॉ . सागर गारटे व त्यांचे सर्व सहकारी , यांनी आयोजित सर्व रोग निदान शिबिरात नागरिकांच्या वैयक्तिक तपासण्या बरोबरच , समस्या खास करून वृद्ध व महिलांच्या समस्याची निवारण करून उपचार करण्यात आले. त्याबरोबरच यावेळीच साकोळ प्राथमिक आरोग्य केंद्राचे लॅबअसिस्टंट बबन पाटोळे यांनी ग्रामस्थांच्या रक्त नमुन्याच्या विविध तपासण्या करून रिपोर्ट दिले .

महाविद्यालयाच्या वतीने पशुरोग निदान शिबिरासाठी तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ गोहलेर डी एस, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी साकोळचे डॉ संग्राम चेनाळे , येरोळ च्या उपकेंद्राच्या डॉ . ज्योती गंभीरे (शिंदे ), राणी अंकुलग्याचे डॉ संदीप मगर कर्मचारी स्वाती पाटील इत्यादी तालुक्यातील अधिकारी व कर्मचारी तसेच गावातील श्री जगदीश सूर्यवंशी, तानाजी शिंदे यांच्या सहकार्याने घेण्यात आले .

महाविद्यालयाच्या वतीने रक्तदान शिबिर श्री संदीप ढोपरे माऊली ब्लड सेंटर लातूर यांच्या वतीने घेण्यात आले याला गावातील युवकांनी व स्वंय सेवकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला .

मौजे तळेगाव (दे )येथे विशेष शिबिर घेण्यासाठी डॉ .मल्लिकार्जुन करजगी संचालक राष्ट्रीय सेवा योजना विभाग स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड यांनी परवानगी दिल्याबद्दल त्यांचे ही आभार ,महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रतापराव माने यांनी शिबीर घेण्यासाठी परवानगी व मदत केल्याबद्दल त्यांचे ही आभार, तसेच महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ.नारायण सूर्यवंशी मौजे तळेगाव ( दे ) च्या सरपंच कांताबाई कांबळे, उपसरपंच पंडितराव शिंदे, चेअरमन अनंत शिंदे

realme Shot on realme 6
2024/06/13 12:24
SHIVNERI COLLEGE ... TPAL

,ग्रामपंचायत सदस्य जगदीश सूर्यवंशी ,पंडित लवटे, चंद्रकला सूर्यवंशी, मनीषा शिंदे ,शालुबाई कांबळे , सोजरबाई मुदमे, जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक वीरेंद्र उस्तुर्गे , श्री सूर्यवंशी सर ,पाटील सर, तानाजी कदम, ग्राम पंचायतीचे कर्मचारी गणेश सूर्यवंशी, कालिदास सूर्यवंशी इत्यादींनी आमच्या सात दिवसाच्या शिबिरात सहकार्य केल्याबद्दल त्यांचे आभार .

दि . १४ / ०२ / २०२३

रोजी राष्ट्रीय सेवा योजना विभागा च्या विद्यार्थ्यांनी मौजे तळेगाव (दे ) गावाकडे प्रस्थान करून निवास ठिकाण व परिसराची साफसफाई केली . स्वयंसेवकाचे गट पाडण्यात आले . गावातून पर्यावरण संवर्धनासाठी तसेच स्वच्छतेचे महत्व पटावे म्हणून जनजागृती फेरी काढण्यात आली . फेरीच्या माध्यमातून गावामध्ये वातावरण निर्मिती करण्यात आली . याच दिवशी जिल्हा परिषद शाळेतील घनकचरा जमा करून खड्डा करून त्यात टाकण्यात आला .तसेच संध्याकाळी गावातील लोकांशी मारुती मंदिरात बसून हितगुज करण्यात आले . एकंदरीत पहिल्याच दिवशी गावात वातावरण निर्मिती करण्यात आली . ज्यामुळे पुढील सात दिवस लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळेल .

दि . १५ / ० २ / २०२३

रोजी सकाळी ६ . ३० वा . योगासने व प्राणायाम घेण्यात आली . त्यात काही गावकरी व तरुण मुले मुली आमच्या स्वयंसेवकाबरोबर सहभागी झाले .

सकाळी ठीक अकरा वाजता विशेष शिबिराचे रीतसर उद्घाटन झाले विशेष शिबिराचे उद्घाटन दिनांक १५फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा .सेवानिवृत्त कृषी उपसंचालक मा. श्री विजयकुमार व्यंकटराव पाटील यांच्या हस्ते करण्यात आले . या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष श्री प्रतापराव माने हे होते .तर यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गटविकास अधिकारी बी टी चव्हाण ,संस्थेचे सचिव पद्माकर मोगरगे, संस्थेचे कोषाध्यक्ष जयेश माने, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संजय गवई सर, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ . नारायण सूर्यवंशी, यांच्यासह गावच्या सरपंच कांताबाई कांबळे, उपसरपंच पंडितराव शिंदे ,ग्रामपंचायत सदस्य पंडित लवटे, जगदीश सूर्यवंशी, लताबाई सूर्यवंशी, चंद्रकला सूर्यवंशी, सोजरबाई मुदमे, शालुबाई कांबळे, मनीषा शिंदे, तंटामुक्तीचे अध्यक्ष संजय सूर्यवंशी, सेवा सोसायटीचे चेअरमन अनंतराव शिंदे , व्हा

SHIVNERI COLLEGE * SHIRUR ANANTPAL

चेअरमन व्यंकटराव सूर्यवंशी ,जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक वीरेंद्र ऊसतुर्गे, शालेय समितीचे अध्यक्ष हरिदास सूर्यवंशी, गावचे ग्रामसेवक जगन्नाथ राऊत यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती .कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ . अमोल इंगळे यांनी केले . तर आभार डॉ . पांडुरंग मुठ्ठे यांनी मांनले , सूत्रसंचालन विद्यार्थिनी प्रतिनिधी कु . सुषमा गंभीरे हिने केले .

दुपारी ठीक दोन वाजता 'युवक व्यसनाधीनता आणि आरोग्य 'या विषयावर प्रा . बालाजी हालसे डॉ .शिंदे पी आर .,प्रा. शिंदे के .यु प्रा. कुंमदाळे पी .जी यांनी विद्यार्थ्यांना सविस्तर असे मार्गदर्शन केले .

सायंकाळी सात ते नऊ या दरम्यान माजी वसुंधरा माझी जबाबदारी या विषयावर स्वयंसेवकासह ग्रामस्थांना डॉ .जाधव ओ . डब्ल्यू डॉ . मुक्के व्ही .के डॉ . सूर्यवंशी के ए. यांनी सखोल असे मार्गदर्शन केले . यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इंगळे , डॉ पांडूरंग मुठ्ठे यांची प्रमुख उपस्थीती होती . या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम हरनुळे यांनी केले तर आभार जयेश होळकर यांनी मानले .

## दि . १६ / ० २ / २०२३

सकाळी ९ ते ११ दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदान केले . त्याबरोबरच दुपारी १२ ते २ या वेळेत विशेष शिबिरामध्ये ग्रामस्थांची ग्रामीण रुग्णालय शिरुर अनंतपाळ येथील डॉ . सागर गारठे , डॉ . बाबासाहेब त्रिभूवन व साकोळ येथील प्राथमीक आरोग्य केंद्राचे वैधकीय अधिकारी डॉ संदीप मंत्रे डॉ विपुलता कांबळे यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिरामध्ये जवळपास १५८ पेक्षा जास्त ग्रामस्थांची आरोग्य तपासणी केली व रुग्णाना औषध गोळया वाटप करण्यात आल्या .

त्या बरोबरच साकोळ प्राथमीक आरोग्य केंद्रातील लॅब आसिस्टंट बबन पाटोळे श्री गणेश अर्जुने हे उपस्थित होते . सदरील कार्यक्रमांमध्ये रुग्णाची सीबीसी, केफटी, एल एफ टी, कोलेस्ट्रॉल, हिमोग्लोबिन, अशा विविध तपासण्यासाठी लागणारे रक्त लघवी घेण्यात आले, या तपासणीचा अहवाल तयार करून तो रासेयो च्या स्वंयसेवका मार्फत गावातील तपासणी करून घेतलेल्या रुग्णाच्या घरोघरी जाऊन देण्यात आला. सदरील शिबिरामध्ये जवळपास ८०रुग्णाची रक्त तपासणी बबन पाटोळे व गणेश अर्जुने यांनी केली . तसेच ज्योती हसणे ,सौ मनीषा मुरंबे, सौ .मीनाताई श्रीमंगले, शिवकन्या लोहार, इत्यादी कर्मचारी आरोग्य केंद्रातर्फे आले होते .सदरील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु . सुषमा ग [illegible] केले तर आभार कु . [illegible] चामले हिने मांनले या प्रसंगी

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ . पांडुरंग मुट्ठे डॉ.अमोल इंगळे कर्मचारी फिरोज तांबोळी सुरेंद्र कुंभार गणेश सूर्यवंशी कल्याण सूर्यवंशी व रा से यो चे स्वयंसेवक, विद्यार्थी ,विद्यार्थिनी गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते .

तर दुपारी २ ते ४ च्या दरम्यान महिला उद्योजक : संधी आणि आव्हाने, जलसंवर्धन काळाची गरज या विषयावर डॉ .सतीश कुंडलवार, प्रा . वर्षा खरोबे मॅडम, डॉ .वागलगावे एन .डी, प्रा .कांबळे एस एन, डॉ.शिंदे जे यु, मॅडम ,प्रा . विलास लुटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .

तर सायंकाळी ७ ते ९च्या दरम्यान संत साहित्य आणि समाज ,भारतीय स्वातंत्र्याची ७५ वर्षे या विषयावर स्वयंसेवक विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना प्रा . रोडगे जी .एस, डॉ . जाधव डी .बी, डॉ . एन . बी सूर्यवंशी, डॉ . रायभोळे यु .के ,डॉ . एस व्ही माने, यांनी सखोल असे ग्रामस्थांना व स्वयं सेवकांना मार्गदर्शन केले .

दि . १७ / ०२ / २३

सकाळी ९ ते ११ या दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून तळेगाव ( दे ) येथे असले ल्या ओपन जिम चा परिसराची स्वच्छता करून ती ओपन जिम वापरण्यास योग्य केली .

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मौजे तळेगाव ( दे ) येथे सुरू असलेल्या 'युवकांचा ध्यास :ग्राम - शहर विकास ' विशेष युवक शिबिरामध्ये माऊली ब्लड सेंटर लातूर यांच्या माध्यमातून रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते . यामध्ये गावातील नागरिक व विद्यार्थी प्राध्यापक कर्मचारी यांनी एकूण ४८ जणांनी रक्तदान केले .याप्रसंगी माऊली ब्लड सेंटरचे संचालक संदीप ढोपरे,बालाजी नरहरे, कोमल राठोड, अश्विनी शिंदे ,तब्बसुम पठाण, आरती कांबळे, कार्यक्रम अधिकारी डॉ . अमोल इंगळे डॉ . पांडुरंग मुट्ठे प्राचार्य डॉ . एन बी सुर्यवंशी,प्रा . विलास लुटे ,प्रा . संदीप वडनेरे, प्रा . रुपेश अंधारे ,प्रा . एम .डी वाकडे, प्रा मारुती गायकवाड ,कर्मचारी संजय सूर्यवंशी सुरेंद्र कुंभार फिरोज तांबोळी व गावातील ग्रामस्थ , शिबिरार्थी स्वयंसेवक विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान शिबिर यशस्वी केले .

दुपारी २ ते ४ दरम्यान भारतीय लोकशाही आणि मतदार जागृती या विषयावर डॉ . धुमाळे डी के . व प्रा . शेख एस एल . यांनी मार्गदर्शन केले तर, डिजीटल साक्षरता काळाची गरज या विषयावर प्रा . कुरे के . व्ही प्रा . वाकडे एम . डी . प्रा . रुपेश अंधारे यांनी विघार्थ्यांना मार्गदर्शन केले .

SHIVNERI COLLEGE * SHIRUR ANANTPAL *

सायंकाळी ७ वा. प्रबोधनात्मक कार्यक्रमाच्या माध्यमातून श्री धम्मपाल सावंत यांनी सामाजीक विविध प्रश्नावरती ग्रामस्थ व शिबिरार्थींना विविध गीत गायनाच्या माध्यमातून समाज जागृती केली . या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु . प्रणाली सुडे यांनी केले तर आभार गोविंद कदम यांनी मानले . यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ पांडूरंग मुठ्ठे ,डॉ अमोल इंगळे उपस्थीत होते .

दि . १८ / ०२ / २० २३

सकाळी ९ ते ११ या दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून तळेगाव ( दे ) येथील मुख्य रस्त्याच्या दोन्ही बाजूच्या नाल्या साफ सफाई करून कच्यरा गोळा करून जाळून टाकला .

१२ ते ३ च्या दरम्यान या विशेष शिबिरामध्ये पशुरोग निदान शिबिरात गावातील गाय , म्हैस ,बैल, शेळया, मेंढया, कुत्रे अदि पाळी व या मुक्या प्राण्यासाठी महाविद्यालयाने पशुरोग निदान आणि उपचार शिबिर आयोजित केले होते . सदरील शिबिरामध्ये ५२ पेक्षा जास्त पाळीव जनावरांची तपासणी करून उपचार करण्यात आले . यात लाळ खुरकुताचे लसीकरण ,बिल्ला मारणे , लंप्पी आजाराची लस देणे त्याबरोबरच वंधत्व निवारण तपासणी करण्यात आली ., गेचूड, जंत निर्मूलनाचे लस दिली , कॅल्शियमचे इंजेक्शन असे देण्यात आले या कामी तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. गोल्हेर डी .एम सहाय्यक पशुधन विकास अधिकारी डॉ .संग्रामचेनाळे डॉ .ज्योती गंभीर ( शिंदे ),डॉ .संदीप मगर कर्मचारी स्वाती पाटील यांनी सहकार्य केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा . डॉ . पांडुरंग मुठ्ठे डॉ .अमोल इंगळे कर्मचारी फिरोज तांबोळी सुरेंद्र कुंभार ग्रामपंचायत सदस्य जगदीश सूर्यवंशी गणेश सूर्यवंशी कालिदास सूर्यवंशी आणि राष्ट्रेश्वर योजनेचे विद्यार्थी विद्यार्थिनी परिश्रम घेऊन हे शिबिर यशस्वीरित्या पार पाडले .

दुपारी २ ते ४दरम्यान प्रा गायकवाड एम . जी . व डॉ . बोंडगे ए. एस यांनी 'राष्ट्रीय सेवा योजनेत युवकांची भूमिका 'या विषयावर सविस्तर असे मार्गदर्शन स्वंयसेवक विधार्थांना केले . तर 'महिला सक्षमीकरण व बचत गट ' या विषयावर डॉ सोमवंशी एम वाय. प्रा . माने एस एस . प्रा वडनेरे एस एम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले .

रात्री . ७ वा . अंधश्रद्धा निर्मुलन व जादूचे प्रयोग या विषयावर माधव बावगे सरांनी तब्बल चार तास विविध प्रयोगाच्या माध्यमातून भूत, पिसा, जादू टोना ,चेटकी, भानामती, या विषयीची असलेली नागरीकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनातील भिती विविध प्रयोग दाखवून दूर केली . या

SHIVNERI COLLEGE SHIRUR ANANTPAL
realme Shot on realme

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन कु . प्रणाली सुडे यांनी केले तर आभार गोविंद कदम यांनी मानले . यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ पांडूरंग मुठ्ठे ,डॉ अमोल इंगळे उपस्थीत होते . ग्रामस्थ यांनी सहकार्य केले . या कार्यक्रमाचा लाभ मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी घेतला .

दि . १९ / ०२ / २० २३

सकाळी ९ ते ११ या दरम्यान स्वयंसेवकांनी श्रमदानाच्या माध्यमातून तळेगाव ( दे ) येथील गावातील कुंटूबाचे स्वंयसेवक विद्यार्थ्यांचे गट करून 'बालविवाह प्रतिबंध करण्यासाठी ' स्वंयसेवकाच्या माध्यमातून जवळ पास २२३ कुंटूबाचा सर्वे करण्यात आला . हा सर्वे करीत असताना सहभागी ७५ स्वंय सेवकाचे गट तयार करून प्रत्येक गटात ४ स्वंयसेवक या प्रमाणे १ गटाला १२ कुंटूंबाचे सर्वेक्षण करण्यासाठी दिले होते . असे जवळपास २२३ कुंटुंबाचा सर्वे करण्यात आला .

रासेयो च्या वतिने दुपारी १२ वा . जिल्हा कृषी उपविभागीय अधिकारी महेश क्षिरसागर तालुका कृषी कार्यालयाचे मंडळ अधिकारी बाळासाहेब गाढवे यांच्या उपस्थीतीत 'आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य 'वर्षा निमित्त तळेगाव ( दे ) येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून गावातील शेतकर्याना व शिबिरार्थी स्वयंसेवक विद्यार्थ्यांना भरड धान्यामधील ( मिलेटस ) अंतर्गत ज्वारी, नाचणी ,बाजरी ,राळा, आधी धान्याचे मानवी आहारात काय महत्त्व आहे. या संदर्भात मार्गदर्शन करून पौष्टिक आहार घेण्या संदर्भात विद्यार्थ्यांना सांगितले यावेळी पंचायत समितीचे कृषी विस्तार अधिकारी गायकवाड आत्म्याचे बालाजी तिडके कृषी सहायक बस्वराज सूर्यवंशी व गावातील प्रगतशील शेतकरी विद्यार्थी यावेळी उपस्थित होते .

सायंकाळी ७ वा. शाहीर प्रा . डॉ सादिक शेख व त्यांचा कला मंच यांच्या वतिने दारुत रंगला संसार भंग ला हा विनोदी नाटकाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे समाज प्रबोधन केले . त्या बरोबरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज याच्या प्रतिमेचे पुजन करून प्रा . डॉ . सादिक शेख यांनी छत्रपती शिवराय यांचा पवाडा गाऊन आपल्या विविध नाटके यांचे प्रदर्शन ग्रामस्थ व शिबीरार्थी विधार्थ्याना प्रबोधनाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम हरनुळे यांनी केले . तर प्रस्तावीक कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इंगळे यांनी केले व आभार डॉ . पांडूरंग मुठ्ठे यांनी मानले .

SHIVNERI COLLEGE
SHIRUR ANANTPAL

realme Shot on realme
2024/04/13 12:24

दि . २० / २ / २० २३

सकाळी ९ वाजता शिबीरार्थी विद्यार्थी यांनी विशेष वार्षीक शिबीरात विविध उपक्रमा पैकी एक ' बाल विवाह प्रतिबंधात्मक ' रॅलीचे आयोजन करण्यात आले होते . या रॅली मध्ये स्वयं सेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवीला व त्या बरोबरच जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी ही या रॅलीत स्वंय उत्सपुर्त पणे सहभागी होऊन . मानवी साखळी व्दारे विविध फलक ,बॅनर, घोषवाक्य, व घोषणा च्या माध्यमातुन या गंभीर प्रश्नाकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्षे केंद्रीत केले . या पुरोगामी महाराष्ट्रात व विशेषताह मराठवाडयात परभणी नंतर लातूर जिल्हयाचे नाव बालविवाह संदर्भाने घेतले जाते . म्हणून या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांनी कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ पांडूरंग मुठ्ठे , प्रा डॉ .अमोल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष रॅलीचे आयोजन करून समाज प्रबोधना बरोबरच विविध घोष वाक्या व्दारे व तोंडी घोषणा देऊन जनजागृती केली त्या बरोबरच .तळेगाव (दे ) येथील बालविवाहाच्या संदर्भाने जवळपास २२३ कुटुंबाचे सर्वेक्षण करून वय वर्षे १२ते१८ वयातील मुलींचा सर्वेव्दारे शोध घेण्याचा प्रयत्न केला .

महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप तळेगाव ( दे ) येथील हनुमान मंदिराच्या समोर संपन्न झाला . या समारोपाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड सुतेज माने हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड , रासेयो चे तालुका समन्वयक प्रा डॉ . सुनिल गरड, गावच्या सरपंच कांताबाई कांबळे, उपसरपंच पंडीतराव शिंदे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ . नारायण सुर्यवंशी , महाराष्ट्र फार्मस महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा . परवेज सर , कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ पांडूरंग मुठ्ठे प्रा. डॉ अमोल इंगळे यांची व्यासपीठावर उपस्थीती होते .

या ठिकाणी प्रवीण राठोड यांनी स्वयंसेवक विद्यार्थ्यांना व ग्रामस्थांना मार्गदर्शन करताना मनाले . कि युवा पिढीने व्यसनापासून दूर राहत आपले भविष्य घडविण्यासाठी स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करून चांगल्या नौकरी मिळवाव्यात असे तळेगाव ( दे ) येथे दि २० फेब्रुवारी रोजी शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष वर्षीक शिबीराच्या आयोजीत समारोप प्रसंगी सपोनि प्रविण राठोड यांनी शिबीर्थी विद्यार्थी व विद्यार्थीनीना मार्गदर्शन करताना म्हणाले .पुढे बोलताना सपोनि प्रविण राठोड म्हणाले कि आजचे युवक व्यसनात गुंतले आहेत . व्यसन करण्यासाठी पैसे मिळत नसतील तर वाईट मार्गाचा अवलंब करतात वेळ प्रसंगी चोरी करून

SHIVNERI COLLEGE SHIRUR ANANTPAL
realme Shot on realme 6
2024/04/13 12:38

आपल्या गरजा पूर्ण करतात . मुलींनी शुद्धा गैरवर्तन करणाऱ्या मुला पासून दूर राहवे व आपले करीअर घडवावे . चांगल्या नौकर्या मिळविण्यासाठी स्पर्धा परिक्षेची तयारी करून आनेक क्षेत्रात नौकरीच्या असलेल्या संधी मिळवाव्यात असे आव्हान यावेळी राठोड यांनी विद्यार्थ्यांना आव्हान केले .

त्याबरोबरच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एन एस एस या योजना महाविद्यालयात राबवल्या जातात . राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण होते . ग्रामीण भागात जाऊन ग्रामीण भागातील समस्या त्यांना जवळून पाहता येतात .विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या प्रकल्पाच्या माध्यमातून शारीरिक श्रम करण्याची सवय त्यांना लागते .तसेच अशा शिबिरातून बौद्धिक धडे ही दिले जातात . राष्ट्रीय एकात्मता जपली जाते . खास करून मुलींनी शिक्षण घेऊन अन्यायाला वाचा फोडली पाहिजे असे ही ते म्हणाले .

यावेळी रासेयोचे तालुका समन्वयक प्रा डॉ . सुनिल गरड , बाळकृष्ण सुर्यवंशी, प्राचार्य डॉ नारायण सुर्यवंशी , अँड सुतेज माने, जगदीश सुर्यवंशी , उपसरपंच पंडीतराव शिंदे यांनी ही यावेळी मार्गदर्शन केले . या वेळी शिबीर्थी स्वयंसेवक कु . आसावरी चामले, कु . प्रणाली सुडे , कु सुषमा गंभीरे, गोविंद कदम यांनी आपले शिबीरातील सात दिवसात आलेले अनुभव कथन केले .

या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व प्रस्तावीक कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ . अमोल इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन कार्यक्रम अधिकारी प्रा . डॉ पांडूरंग मुठ्ठे यांनी मानले . यावेळी कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे कर्मचारी सुरेंद्र कुंभार ,फिरोज तांबोळी, तानाजी शिंदे ,पंडीतराव लवटे, ग्राम पंचायत कर्मचारी गणेश सुर्यवंशी कालिदास सुर्यवंशी, शिबीर्थी विद्यार्थी, प्राध्यापक, ग्रामस्थ यांनी यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले :

शिवनेरी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाची विशेष शिबिराचा समारोप तळेगाव (दे ) येथे दि २० फेब्रुवारी २०२३ रोजी झाला . या सात दिवसाच्या विशेष वार्षीक शिबीरात शिबीरातील विद्यार्थी व कार्यक्रम अधिकारी यांच्यापुढाकारातून तळेगाव देवणी गावात आरोग्य तपासणी शिबिर प्राथमिक आरोग्य केंद्र साकोळ व ग्रामीण रुग्णालय श्रीरामपूर यांच्यावतीने घेण्यात आली ज्यामध्ये 158 रुग्णाची तपासणी करण्यात आली तर पशुरोग निदान शिबिर पशुधन विकास अधिकारी डॉक्टरच्या वतीने घेण्यात आली ज्यामध्ये ५२ पेक्षा अधिक पशु ची तपासणी व लसीकरण

SHIVNERI COLLEGE SHIRUR ANANTPAL

realme Shot on realme 6
2024/04/13 13:25

करण्यात आले . त्याबरोबरच माऊली ब्लड सेंटर यांच्यावतीने घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरामध्ये ४८ रक्तदात्यांनी अनमोल असे रक्तदान केले . तालुका कृषी कार्यालय यां च्या सहकार्यातून आंतर राष्ट्रीय तृण धान्य वर्षानिमित भरड धान्या विषयीचे महत्व विद्यार्थी व ग्रामस्थांना सांगीतले . त्याबरोबरच अंधश्रद्धा निर्मूलन व जादूचे प्रयोग माधव बावगे सरांनी करून दाखवून समाज जागृती केली . तर समाजप्रबोधनकार धम्मपाल सावंत यांच्या कला मंचाने समाज प्रबोधन गिताच्या माध्ययमातून समाज जागृती केली . तर प्रा डॉ सादिक शेख यांच्या कला मंचांने विविध नाटीकेच्या माध्यमातुन समाज प्रबोधन केले . त्याबरोबरच विद्यार्थ्यांनी गावामध्ये श्रमदानाच्या माध्यमातून गावाची पूर्ण साफसफाई केली लोकांना सांडपाणी रस्त्यावर न सोडता त्यासाठी नाली करून दिली . त्याबरोबरच गावच्या शेजारी असलेल्या ओपन जिमचा परिसर साफसफाई करून स्वच्छ केला . जिल्हा परिषद शाळा ते तळेगाव देवणी येथील मुख्य चौकापर्यंत रस्त्याच्या साईडने लावलेल्या झाडांना आळे करून पाणी घातले व प्लॅस्टिक कचरा जमा करून जाळून टाकला असे विविध सामाजिक कार्यक्रम सात दिवसाच्या शिबीरात घेण्यात आले .

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
शिवनेरी महाविद्यालय,
शिरूर अनंतपाळ जि. लातूर

प्राचार्य
शिवनेरी महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
शिरूर अनंतपाळ जि. लातूर

SHIVNERI COLLEGE
SHIRUR ANANTPAL

दिनांक 20/02/2023 महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचा समारोप तळेगाव ( दे ) येथील हनुमान मंदिराच्या समोर संपन्न झाला . या समारोपाच्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे उपाध्यक्ष अॅड सुतेज माने हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून शिरूर अनंतपाळ पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड , रासेयो चे तालुका समन्वयक प्रा डॉ . सुनिल गरड, गावच्या सरपंच कांताबाई कांबळे, उपसरपंच पंडीतराव शिंदे, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ . नारायण सुर्यवंशी , महाराष्ट्र फार्मस महाविद्यालयाचे कार्यक्रम अधिकारी प्रा . परवेज सर , कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ पांडूरंग मुठ्ठे प्रा. डॉ अमोल इंगळे यांची व्यासपीठावर उपस्थीती होते











**पुण्यनगरी**

## 'शिवनेरी'च्या रासेयो शिबिराचा समारोप



Latur Edition
Feb 24, 2023 Page No. 5
Powered by : eReleGo.com

**देशोन्नती**

## युवा पिढीने व्यसनापासून दूर राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी

सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रविण राठोड यांचे प्रतिपादन



SHIVNERI COLLEGE ★ SHIRUR ANANTPAL

कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
शिवनेरी महाविद्यालय

प्राचार्य
शिवनेरी महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
शिरूर अनंतपाळ जि. लातूर

realme Shot on realme

तालुक्यातील तळेगाव (दे) येथे आयोजीत दिनांक 19/02/2023 रोजी विशेष वार्षीक शिबीरात श्रमदान,बालविवाह प्रतिबंधक योजनेसाठी 224 कुटूंबाचा सर्वे करण्यात आला अंतरराष्ट्रीय पोष्टिक तृणधान्य वर्षा निमित्त कार्यक्रम त्यांचे फोटो व विविध वृतमानपत्रातील बातम्याचे कात्रण



पुण्य नगरी

## बालविवाह विरोधी प्रतिबंधात्मक रॅलीतून जनजागृती



Latur Edition
Feb 25, 2023 Page No. 8
Powered by : eReleGo.com



पुण्य नगरी

## शेतकऱ्यांनी नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करावा : महेश क्षीरसागर

शिरूर अनंतपाळ :




Smart Latur Edition
Feb 19, 2023 Page No. 6
Powered by : eReleGo.com

SHIVNERI COLLEGE * SHIRUR ANANTPAL




यशवंत रविवार दि. १९ फेब्रुवारी २०२३ ३

## मानवी आहारात भरड धान्य गरजेचे - कृषी मंडळअधिकारी बाळासाहेब मादवे







कार्यक्रम
राष्ट्रीय सेवा योजना
शिवनेरी महाविद्यालय
अनंतपाळ जि. लातूर

(कला, वाणिज्य व विज्ञान)
शिरूर अनंतपाळ जि. लातूर


realme Shot on realme 6

दिनांक 19/02/2023 रोजी सायंकाळी ७ वा. शाहिर प्रा. डॉ सादिक शेख व त्याचा कला मंच यांच्या वतिने दारुत रंगला संसार भंग ला हा विनोदी नाटकाच्या माध्यमातून ग्रामस्थांचे समाज प्रबोधन केले . त्या बरोबरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त सर्व प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करुन प्रा.डॉ. सादिक शेख यांनी छत्रपती शिवराय यांचा पवाडा गाऊन आपल्या विविध नाटके यांचे प्रदर्शन ग्रामस्थ व शिबीरार्थी विधार्थ्यांना प्रबोधनाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले . या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शुभम हरनुळे यांनी केले . तर प्रस्तावीक कार्यक्रम अधिकारी डॉ अमोल इगळे यांनी










केले व आभार डॉ . पांडुरंग मुठ्ठे यांनी आभार मानले





कार्यक्रमाधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना
शिवनेरी महाविद्यालय,
शिरूर अनंतपाळ जि. लातूर

प्राचार्य
शिवनेरी महाविद्यालय
(कला, वाणिज्य व विज्ञान)
शिरूर अनंतपाळ जि. लातूर

realme Shot on realme

दिनांकर० / २ / २० २३ सकाळी ९ वाजता शिबीराथी विद्यार्थी यांनी विशेष वार्षीक शिबीरात विविध उपक्रमा पैकी एक ' बाल विवाह प्रतिबंधात्मक ' रॅलीचे आयोजन करण्यात आले होते . या रॅली मध्ये स्वयं सेवकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवीला व त्या बरोबरच जिल्हा परिषद शाळेच्या विद्यार्थ्यांनी ही या रॅलीत स्वंय उत्सपुर्त पणे सहभागी होऊन . मानवी साखळी व्दारे विविध फलक ,बॅनर, घोषवाक्य, व घोषणा च्या माध्यमातुन या गंभीर प्रश्नाकडे संपूर्ण ग्रामस्थांचे लक्ष केंद्रीत केले . या पुरोगामी महाराष्ट्रात व विशेषताह मराठवाड्यात परभणी नंतर लातूर जिल्हयाचे नाव बालविवाह संदर्भाने घेतले जाते . म्हणून या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरार्थ्यांने कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ पांडूरंग मुळ्ठे , प्रा डॉ . अमोल इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली या विशेष रॅलीचे आयोजन करून समाज प्रबोधना बरोबरच विविध घोष वाक्या व्दारे व तोंडी घोषणा देऊन जनजागृती केली त्या बरोबरच .तळेगाव (दे ) येथील बालविवाहाच्या संदर्भाने जवळपास २२५ कुटुंबाचे सर्वेक्षण करून वय वर्षे १२ ते १८ वयातील मुलींचा सर्वेव्दारे शोध घेण्याचा प्रयत्न केला.














## युवा पिढीने व्यसनापासून दूर राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करावी : प्रविण राठोड



महाराष्ट्र सारथी

## युवा पिढीने व्यसनापासून दूर राहून, स्पर्धा परीक्षेची तयारी करावी : सपोनि प्रविण राठोड






realme Shot on realme 6
2024/04/13